# खेळता खेळता ॲटॅक आला, १० वर्षाच्या मुलासोबत नियतीचा क्रूर खेळ!

**कोल्हापूर**–गणेशोत्सवाच्या काळात एक धक्कादायक घटना कोल्हापूर जिल्ह्यातल्या कोडोली येथे घडलीये. गणेशोत्सवाची धावपळ सुरू होती. संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण होते. मात्र, एका आईचा आक्रोश ऐकून संपूर्ण गाव हादरले. हृदयविकाराच्या धक्क्याने दहा वर्षीय मुलाचा दुर्दैवी अंत झाला. आपल्या मित्रांसोबत गणेश मंडळाच्या मंडपात श्रावण खेळत होता. मस्त धमाल मस्ती करत होता. खेळून खेळून दमल्यानंतर तो आपल्या आईकडे गेला आणि चक्क आईच्याच मांडीवर त्याने जीव सोडला. खेळता खेळता आईच्या मांडीवरच श्रावण गावडे याने प्राण सोडले.

कोल्हापूर जिल्ह्यातल्या कोडोली येथील या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेली अधिक माहिती अशी की, मित्रांसोबत गणेश मंडळाच्या मंडपात श्रावण गावडे हा खेळत होता. अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने तो मध्येच खेळ सोडून आपल्या आईच्या कुशीत जाऊन झोपला. मात्र, आईच्या मांडीवर डोके टेकवले आणि श्रावणला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. आईला काही कळण्याच्या आतच श्रावण याने जीव सोडला.

**खेळता खेळता दमला आणि...**

मुलगा काहीच हालचाल करत नसल्याचे आईच्या लक्षात आले आणि तिने एकच हंबरडा फोडला. श्रावणच्या आईचा आवाज ऐकून लोकांनी लगेचच तिकडे धाव घेतली. वेळ अजिबात न घालता श्रावण याला जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून श्रावणचे निधन झाल्याचे स्पष्ट केले आणि संपूर्ण गावात शोककळा पसरली. कोणालाच विश्वास बसत नव्हता की, आताच गणपतीच्या मंडपात खेळत मजा मस्ती करणारा श्रावण हा आपल्यात राहिला नाही.

## पाणलोटात पावसाचा जोर वाढला

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** भंडारदरा, मुळा धरणाच्या पाणलोटात पाऊस वाढत असल्याने विसर्गही अधिक सोडण्यात येत आहे. गंगापूर आणि अन्य धरणातून पाणी सोडण्यात येत असल्याने गोदावरीचा विसर्गही आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# नगरमध्ये ३० हजार लाडक्या बहिणी अपात्र?

## तपासणी अंतिम टप्प्यात; आर्थिक लाभाला मुकण्याची शक्यता

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी लागू केलेल्या लाडकी बहिण योजनेत नगर जिल्ह्यातील १ लाख २५ हजार महिलांच्या अर्जाची पडताळणी सुरू आहे. ही पडताळणी आता अंतिम टप्प्यातून या सव्वा लाख लाडक्या बहिणीपैकी सुमारे ३० ते ३५ टक्के म्हणजेच ३० हजार महिला योजनेला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. पडताळणीनंतर संबंधीत महिलांना सरकारच्यावतीने देण्यात येणार आर्थिक लाभ बंद होणार असल्याची शक्यता सुत्रांनी वर्तवली आहे.

नगर जिल्ह्यात गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीपूर्वी लागू केलेल्या लाडक्या बहिण योजनेत ११ लाख ५० हजारांहून अधिक महिलांचा समावेश करण्यात आला होता. जिल्ह्यातील ११ लाख ५० हजारांहून अधिक महिलांना महिन्याला दीड हजार याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात येती होती. दरम्यान, महिनाभरापूर्वी राज्य सरकारच्यावतीने १ लाख २५ हजार महिलांची यादी जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभागाला पाठवण्यात आली असून या यादीतील महिलांची पडताळणी सध्या गाव पातळीवर अंगणवाडी सेविका आणि महिला कल्याण विभागाच्या कर्मचाऱ्यांच्यावतीने करण्यात येत आहे. यात पडताळणीत जिल्ह्यात ३० ते ३५ टक्के महिला अपात्र ठरण्याची भिती व्यक्त होत आहे.

सुरू असणाऱ्या पडताळणीतील प्राथमिक अंदाजानुसार ही स्थिती वर्तवण्यात आली आहे. अपात्र ठरणाऱ्या महिलांमध्ये १८ पेक्षा कमी अथवा ६५ पेक्षा जादा वय असणाऱ्या महिलांचा समावेश असून वयाच्या अटीत बसत नसतांनाही त्यांनी अर्ज भरून दिल्यानंतर सरकारकडून सुरूवातील पडताळणी न केल्याने या महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ सुरू आहे. दरम्यान, कुटूंबाची व्याख्या सरकारकडून स्पष्ट केल्याने एकाच कुटूंबातील दोन पेक्षा अधिक महिलांना या योजनेचा लाभ सुरू असल्यास तो देखील बंद होणार आहे. याची देखील ग्रामीण भागात तपासणी सुरू आहे. महिला बालकल्याण विभागाची यंत्रणा सध्या ग्रामीण भागात लाडक्या बहिणीची पडताळणी करत आहे. गेल्या महिनाभरापासून रेंगाळत रेंगाळत हे काम आता पूर्णत्वाच्या टप्प्यात आले असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

**अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना धडकी**

ग्रामीण भागात लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळत असणाऱ्या महिलांची पडताळणी करतांना अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या नाकीनऊ आले आहेत. योजनेत अपात्र ठरणाऱ्या महिला अथवा त्यांच्या कुटूंबासोबत या अंगणवाडी सेविकांमध्ये वितूस्टता येत असल्याने अंगणवाडी सेविका दडपणाखाली काम करत आहेत. यामुळे अवघ्या आठ दिवसात होणाऱ्या कामाला आता जवळपास महिनाभराचा कालावधी लागला असल्याचे सांगण्यात आले.

**परिवहन खात्याकडील यादी रेंगाळली**

जिल्ह्यातील २२ हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहन असतांना त्यांची नावे लाडक्या बहिण योजनेत आली आहेत. या महिलांची नावे पडताळणीसाठी प्रादेशिक परिवहन खात्याकडे पाठवून सुमारे तीन महिने झाले आहेत. मात्र, परिवहन विभागाकडून त्यानंतर कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्याचे महिला बालकल्याण विभागाच्या सुत्रांचे म्हणणे आहे. तसेच नगर जिल्ह्यात सध्या किती लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळत आहे. याची आकडेवारी सरकार पातळीवर उपलब्ध आहे. जिल्हा पातळीवर या आकडेवारीबाबत गोपनियता पाळण्यात येत आहे.

# त्रिभाषा धोरणाबाबत समिती नियुक्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** शालेय अभ्यासक्रमात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा विषय सक्तीचा करण्याचा निर्णय रद्द करताना त्रिभाषा धोरणाबाबत डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील जाहीर केलेल्या समितीच्या सदस्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीच्या करण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना ठाकरे गट आणि विविध मराठी भाषिक संघटनांनी जोरदार विरोध केला होता. हा विरोध लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी सक्ती बाबतचे १६ एप्रिल आणि १७ जून २०२५चे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याची घोषणा केली होती. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरणाबाबत निर्णय घेण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे फडणवीस यांनी जाहीर केले होते.

त्यानुसार डॉ. जाधव समितीच्या सदस्यांची नावे आज घोषित करण्यात आली. या समितीत सदस्य म्हणून भाषा सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक डॉ. वामन केंद्रे, पुण्यातील शिक्षणतज्ज्ञ डॉ. अपर्णा मॉरीस, डेक्कन महाविद्यालय पुणे येथील भाषा विज्ञान प्रमुख प्रा. सोनाली कुलकर्णी–जोशी, छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षणतज्ज्ञ डॉ. मधुश्री सावजी, बालमानसतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांचा समावेश आहे. तर समग्र शिक्षा अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

# समता परिषदेच्या उद्या उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यात बैठका

**राहुरी (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची आहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, राहाता, राहुरी व नेवासा तालुक्यात तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसींना न्याय देण्याचे कार्य भारत भर सुरू आहे. याच धरतीवर राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, शहर व ग्रामीण भागात गाव तेथे समता परिषदेची शाखा सुरू करण्याच्या दृष्टीने काम सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाभर या प्रमाणे बैठका घेण्यात येणार आहे.

या बैठकीस समता परिषदेचे प्रदेश प्रचारक प्रा. संतोष विरकर, समता परिषदेचे ज्येष्ठ नेते माजी आ. पांडूरंग अभंग, ज्येष्ठ मार्गदर्शक व प्रदेश कार्यकारीणी सदस्य पद्मकांत कुदळे, विभागीय अध्यक्ष मच्छिंद्र गुलदगड, जिल्हाध्यक्ष प्रशांत शिंदे व जिल्हा कार्याध्यक्ष अंकुशराव ताजणे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहे. या बैठकीत तालुकावार कार्याचा आढावा घेवून त्यानुसार पुढील नियोजन करण्यात येणार आहे.

यात पहिल्या टप्प्यात रविवार दि. २ सप्टेबर रोजी सकाळी ८.३० वाजता श्रीरामपूर येथील माळी बोर्डींग, सकाळी ११ वाजता राहाता संत सावता महाराज मंदिर, दुपारी २ वाजता राहुरी ज्येष्ठ नागरीक हॉल या ठिकाणी तर दुपारी ४ वाजता नेवासा शासकीय विश्रामगृह या ठिकाणी बैठक संपन्न होणार आहे.

ओबीसी बांधव समता सैनिकांनी आप–आपल्या तालुक्यातील बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रशांत शिंदे, भाऊसाहेब मंडलीक, सुभाषराव गायकवाड, बाळासाहेब ताजणे, धनंजय गाडेकर, एकनाथ नागले व प्रकाश कुऱ्हे यांनी केले आहे.

# केसापूर येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**आंबी (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील दक्षिणमुखी हनुमान मंदिर केसापूर येथील अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता गणेश महाराज शिंदे उदापूरकर यांच्या नेतृत्वाखाली काल्याच्या कीर्तनाने झाली.



प्रारंभी रथातून दिंडी प्रदक्षिणा टाळ–मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. यावेळी अबालवृद भाविक उपस्थित होते. हा अखंड हरिनाम सप्ताह सराला बेटाचे महंत रामगिरीरी महाराज व देवगडचे मठाधिपती भास्करगिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने, वै.माधव महाराज भगत यांच्या प्रेरणेने व योगेश महाराज मोरगे यांच्या अधिपत्याखाली सुरू होता. सप्ताह काळात कुणाल महाराज बोल्हे, ऋतुजाताई दळवी, जालिंदर महाराज साळुंके, मनोहर महाराज जेजुरकर, किशोर महाराज जाधव, अंकुश महाराज जगताप, योगेश महाराज मोरगे यांची कीर्तने पार पडली. त्यांना गायनाची साथ श्री.शिंदे व टेकाळे महाराज यांनी तर मृदंग वादक श्री.पिसाळ, कुऱ्हे महाराज, हार्मोनियम वादक पुजारी महाराज यांनी साथ दिली. ग्रंथराज ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक कोंडीराम पेचे महाराज होते. भाविकांना दररोज सप्ताहस्थळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सप्ताह यशस्वीतेसाठी सप्ताह समितीसह ग्रामस्थ, युवक मंडळ, भाविक यांनी परिश्रम घेतले.

# जगताप वस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांकडून 'प्लास्टिकमुक्त परिसर'

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** अशोकनगर केंद्रातील जगताप वस्ती शाळेतील



विद्यार्थ्यांनी 'प्लास्टिकमुक्त परिसर' या उपक्रमांतर्गत शाळा व घराचा परिसर प्लास्टिकमुक्त केला. गेल्या काही वर्षांपासून शिक्षिका पल्लवी आल्हाट यांच्या पुढाकारातून व सुवर्णा जगदाळे यांच्या सहकार्याने शाळेने विविध उपक्रम राबवले आहेत.

प्लास्टिक सहज विघटित होत नसल्यामुळे पर्यावरणावर त्याचा दुष्परिणाम होतो. मातीची सुपिकता कमी होते. जलप्रदूषण व वायुप्रदूषण देखील प्लास्टिकमुळे होते. प्राण्यांच्या पोटात प्लास्टिक गेल्यास ते विरघळत नाही व अडकून राहते. यामुळे प्राण्यांना भूक लागत नाही, आतड्यांना इजा होऊ शकते. पचनसंस्था बंद पडून प्राण्यांचा मृत्यू देखील होऊ शकतो, अशी माहिती सौ.पल्लवी आल्हाट यांनी विद्यार्थ्यांना परिपाठात दिली. प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती विद्यार्थ्यांना लक्षात आल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमाचे पालकांनी कौतुक केले.

# कोल्हारचा प्रवरा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात साजरा

**कोल्हार (वार्ताहर)–** जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेला आणि माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या प्रवरा सांस्कृतिक महोत्सवात कोल्हार भगवतीपूर परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

कोल्हार येथील जनसेवा मंडळ आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था यांच्याद्वारे आयोजित मयुरेश्वर एक गाव एक गणपती उपक्रमातील सांस्कृतिक कार्यक्रम प्रवरा हायस्कूलमध्ये रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्रीताई विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. संस्थेच्या कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या प्रेरणेतून कोल्हार परिसरातील विविध संस्थांच्या शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपली कला सादर केली.

एकूण ४२६ मुला–मुलींनी या कार्यक्रमांमध्ये आपल्या कलागुणांना वाव दिला. पर्यावरणपूरक गणेश उत्सवामध्ये पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनाचे संदेश देणारे विविध कार्यक्रम सादर झाले. त्याचप्रमाणे सामाजिक समस्या, देशभक्तीपर गीते, भावगीते, राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केला. विद्यार्थ्यांमध्ये याप्रसंगी स्पर्धा झाली. या स्पर्धेत कै. जनार्दन काळे पाटील विद्यालय, चिंचोली यांना प्रथम क्रमांक मिळाला.




**कोल्हार येथील प्रवरा सांस्कृतिक महोत्सवामध्ये धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. (छाया–संजय कोळसे)**

कोल्हारच्या प्रवरा हायस्कूलला द्वितीय क्रमांक मिळाला. तृतीय क्रमांक संस्कार संपदाने पटकावला.

याप्रसंगी उपस्थितांच्या हस्ते लकी ड्रॉची सोडत काढण्यात आली. बक्षीस विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक– पंकज राऊत, द्वितीय रूपाली कानडे, तृतीय गणेश गुडेकर, चतुर्थ भावना डमरे, पाचवा क्रमांक सुवर्णा भांड, सहावा क्रमांक ज्योती राऊत, सातवा क्रमांक गौरी घोडके, आठवा क्रमांक गौरव राऊत यांना लकी ड्रॉच्या माध्यमातून बक्षीसे मिळाली. बक्षीस वितरण धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रवरा बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे, संभाजी देवकर, प्रकाश खर्डे, अलकाताई देवकर, ऋषिकेश खांदे, विलास खर्डे, गोरक्ष खर्डे, प्रशांत खर्डे, सुनील शिंदे, अक्षय मोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. गीते आणि श्री. गागरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मयुरेश्वर कोल्हार गटातील मुख्य समन्वयक संजय शेळके, कोल्हार येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ आहेर इत्यादींनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### २० वर्षांच्या सेवेनंतर मिळणार...

निर्णयाचा लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे.

दरम्यान यामध्ये असं देखील म्हटलं आहे, की जर एखाद्या कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असेल आणि त्यामुळे जर त्याला कामावरून काढून टाकण्यात आलं असेल तर अशा परिस्थितीत त्या कर्मचार्याला युपीएसमधून एनपीएसमध्ये कनव्हर्ट करता येणार नाही, यामुळे केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### पापाचे धनी कोण?...

गटाचे आ. रोहित पवार व शिवसेना नेते संजय राऊत यांच्यावर टीका केली. नगरमध्ये शिक्षक दिनाच्या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील यांना मराठा आरक्षणाचा नवीन अध्यादेश म्हणजे मराठा समाजाची फसवणूक असा आरोप आ. पवार आणि खा. राऊत यांनी केला असल्याबाबत विचारणा केली. त्यावर मंत्री विखे पाटील यांनी रोहित पवार व खा. राऊत यांच्यावर सडकून टीका केली. राज्यात अडीच वर्षे महाविकास आघाडीचे सरकार होते. शिवाय तुमचे आजोबा हे चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी १९९४ साली मंडल आयोगासाठी शिफारस केली. त्यावेळी मराठा समाजावर अन्याय झाला नाही का? याबाबत रोहित पवार यांनी आपल्या आजोबांना विचाराला हवेत, असे मंत्री विखे म्हणाले. मराठा आरक्षणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणवीस यांनी पुढाकार घेत हा विषय सोडवला यामुळे सर्वस्तरातून त्यांचे कौतूक होत असल्याचे मंत्री विखे म्हणाले.

**ज्येष्ठ नेते भुजबळ यांचे मुद्दे स्पष्ट करणार**

ओबीसी नेते छगन भुजबळ हे ज्येष्ठ आणि प्रभावी नेते आहेत. मराठा आरक्षणाबाबत त्यांच्या मनात काही मुद्दे असतील तर मी समक्ष त्यांची भेट घेवून सर्व मुद्द्यावर स्पष्टीकरण देईल. मराठा आरक्षणावरून विनाकारण गैरसमज निर्माण होत आहेत. ओबीसी समाजाला आरक्षण देतांना मराठा समाजाने कधीच विरोध केला नाही. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असल्याचे ते यावेळी म्हणाले.

**आठवड्याला पडताळणी प्रकरणाचा आढावा**

मधल्या काळात जात पडताळणी कार्यालयाकडे मनुष्यबळाची कमतरता होती. मात्र, आता राज्यात २९ जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे जात पडताळणी कामी नेमणूक करण्यात आलेले आहे. आता जात पडताळीचे काम कालबध्द पध्दतीने करण्यात येणार असून ठरवून दिलेल्या कालावधीत जातीचे दाखले मिळाले पाहिजेत. तसेच जात पडताळणी कार्यालयाकडे माराव्या लागणाऱ्या चकरा थांबवण्यात येणार आहेत. यासाठी महसूल मंत्री यांना मी स्वत: विनंती करणार असून प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दर सोमवारी पडताळणीसाठी दाखल अर्ज आणि दिलेल्या दाखल्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. यातून या कामाला दिशा देण्यात येणार आहे. कितीही निर्णय घेतले तरी जात पडताळणीचे दाखल वेळेवर देणे आवश्यक असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

### गॅझेटच्या आधारावर आरक्षण...

न्याय मिळाला पाहिजे आणि आरक्षणाची गरज आहे, असे स्पष्ट मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले. गॅझेटवरून आरक्षणाचा प्रश्न निकाली लागणार नसल्याचे सांगत त्यांनी राज्य सरकारला याबाबत ठोस धोरण राबवण्याचे आवाहन केले. मराठा आरक्षणाचे आंदोलन थांबवण्याचा निर्णय मनोज जरांगे यांनी घेतल्याबद्दल समाधान व्यक्त करताना ते म्हणाले, हा अत्यंत परिपक्व व महत्त्वाचा निर्णय आहे. आंदोलन चिघळले असते तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण महाराष्ट्रावर झाले असते. म्हणून त्यांनी महाराष्ट्राची, मुंबईची व सर्वसामान्यांची काळजी घेत आंदोलन थांबवले ही त्यांची दूरदृष्टी आहे.

ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा उल्लेख करताना थोरात म्हणाले, ते पुरोगामी विचारांचे व्यक्तिमत्त्व आहेत. मात्र सध्या ते सरकारमध्ये असह्य मानसिकतेने काम करत आहेत हे दु:खद आहे. भाजपचे ध्येय केवळ सत्ता हेच असून ते कोणतीही पद्धत वापरायला मागे हटत नाहीत. पक्षफोड, निवडणूक आयोगाचा ताबा, धर्माचा राजकारणात वापर, समाजात भेद निर्माण करणे हे लोकशाहीला अपूरक असल्याची टीका त्यांनी केली. राज्यातील रस्ते ठेकेदार आत्महत्या करत आहेत. संजय निराधार योजना, श्रावणबाळ योजना योजनांचे पैसे लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नाहीत हे सरकारचे अपयश असल्याची टीकाही केली. तर वारकरी संप्रदायाच्या कीर्तन परंपरेत सर्वधर्म व सर्वपक्षीय लोक सहभागी होत असतात. मात्र भाजपने बोलघेवडे महाराज तयार करून वारकरी परंपरेचा अवमान केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

### मराठा समाजाला काय दिल?...

ओबीसी नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

मनोज जरांगे पाटील म्हणत होते की सरसकट सर्व मराठ्यांना ओबीसीत सामावून घ्या. त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या. तसं करता येत नव्हतं. म्हणून जरांगे म्हणाले, हवं तर तुम्ही सरसकट शब्द काढून टाका. ही हेराफेरी करून त्यांना आरक्षण द्यायचं ठरलं. म्हणूनच तर ते परत गेले. ही मागणी मान्य झाल्याने त्यांनी गुलाल उधळून जल्लोष केला. याद्वारे मराठवाड्यातील तीन कोटी मराठे कुणबी झाले असं ते म्हणाले.

छगन भुजबळ म्हणाले, मराठा आरक्षणासंदर्भात दोन जीआर काढले होते. पहिल्या जीआरमध्ये लिहिलं होतं की मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी–मराठा, मराठा कुणबी नोंदींनुसार प्रमाणपत्र दिलं जावं वगैरे... त्यावर जरांगे यांनी आक्षेप घेतला. ते म्हणाले यामधील पात्र हा शब्द काढून टाका. मग सरकारने दुसरा जीआर काढला. त्यात लिहिलं आहे की मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी, कुणबी–मराठा, मराठा कुणबी नोंदींनुसार प्रमाणपत्र दिलं जावं वगैरे... म्हणजेच हैदराबाद गॅझेटमध्ये नोंदी नाहीत अशा मराठा समाजातील लोकांना आरक्षण देण्यासाठी सदर प्रक्रिया स्वीकारावी वगैरे... असे मुद्दे त्यात आहेत. याद्वारे त्यांना देखील प्रमाणपत्र दिलं जातील.

### कुणी न्यायालयात गेले तरी...

अहवालावर जिवंत असणारे एकमेव आरक्षण मंडल आरक्षण आहे. अहवालावर आरक्षण कधीचं लागून असतं, त्यामुळे मराठा आरक्षणाला काही झालं तर मी मंडल आयोगाला चॅलेंज करणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील गॅलेक्सी रुग्णालयात मनोज जरांगे यांच्यावर उपचार सुरू आहेत. रुग्णालयातून त्यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. यावेळी जरांगे पाटील म्हणाले, आम्ही ओबीसीत घुसखोरी करत नाही. तर अधिकृत आरक्षणात येत आहोत. छगन भुजबळांना चांगलं माहीत होतं मराठे आरक्षण घेणार. आम्ही मुंबईत गेलो, विजय घेऊन परत आलो. भुजबळ यांचा विरोध बघता मराठ्यांनी ओळखायचं की, आपण मराठे जिंकलो आहे. छगन भुजबळ आता शक्यतो ओबीसी नेता असलेली ओळख मिटू देणार नाही. त्याच्यापेक्षाही खूप मातब्बर नेते आहेत. समोरच्या ओबीसी नेत्याची छेड काढतो,अशी बोचरी टीका मनोज जरांगे यांनी केली आहे.

### जबरदस्ती करुन मराठ्यांना...

पवारांवर जोरदार टीका केली. तसेच, सत्ताधाऱ्यांवर टीका करताना ओबीसी समाजाला हा शासन आदेश मान्य नसल्याचे म्हटले. दरम्यान, बारामतीत हाकेचं भाषण सुरू असतानाच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचा त्यांना फोन आला होता. यावेळी, वंचितचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी फोनवरुन येथील सभेला संबोधित केले.

मी अगोदरपासूनच गरीब मराठ्यांना समजावून सांगत होतो की, तुम्ही ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण मागू नका, त्यामुळे दोघांमधील भांडण सुरू होईल. ओबीसीच्या आरक्षणाचा ताट ओबीसींनाच राहिलं पाहिजे, मराठा समजाला आरक्षण पाहिजे असेत तर तुम्ही वेगळं मागा, तरच ते टिकेल, असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं. यापूर्वी दोनवेळा सर्वोच्च न्यायालयाने ओबीसीतून दिलेलं आरक्षण रद्द केलं असून ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही, हेही स्पष्ट केलंय. माझी सर्व ओबीसी बांधवाना विनंती आहे की हा लढा राजकीय लढा आहे. आपण सत्तेत कोणाला बसवतो हा सगळ्यात महत्वाचा प्रश्न आहे. आपण सत्तेत आपल्या विचारांची माणसं बसवली तर आपलं ऐकलं जातं. सत्तेत आपल्या विचारांची माणसं बसली नाहीत, तर आजच्याप्रमाणे जबरदस्ती करण्यात येते. सरकारने आज जबरदस्ती करुन मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलाय. ह्या जबरदस्तीने केलेल्या निर्णयाविरुद्ध आपल्याला लढावं लागणार आहे. मोर्चे, आंदोलनं करावे लागणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून आपल्याला आपलं आरक्षण वाचवाचयं आहे. आपण आपलं मत आरक्षणवाद्यालाच द्याल, अशी अपेक्षा प्रकाश आंबेडकर यांनी या ओबीसीच्या मोर्चातील सभेत फोनवरुन केली.